# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १३७ वा ❑ भारतीय सौर दिनांक १९ आषाढ शके १९४८, शुक्रवार दि.१० जुलै २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### नवे आकाश, नवी झेप : अंतराळात खाजगी क्षेत्राचा उदय

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

गेल्या काही दशकांमध्ये अंतराळ क्षेत्रात केवळ सरकारी संस्थांचे वर्चस्व होते, परंतु आता खाजगी क्षेत्राच्या (स्पेस स्टार्टप्स) प्रवेशामुळे अंतराळ संशोधनाचे एक नवे युग सुरू झाले आहे. संशोधन, उपग्रह प्रक्षेपण आणि व्यावसायिक अंतराळ प्रवासात खाजगी कंपन्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.

भारताच्या अंतराळ क्षेत्रात (स्पेस सेक्टर) खाजगी कंपन्यांचा शिरकाव वेगाने होत असून, यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रो च्या एकाधिकारशाहीकडून आता व्यावसायिक क्रांतीकडे देशाची वाटचाल सुरू झाली आहे. २०२० मध्ये केंद्र सरकारने अंतराळ क्षेत्र खाजगी कंपन्यांसाठी खुले केले. त्यानंतर देशात ४०० हून अधिक अंतराळ स्टार्टअप्स सुरू झाले असून या क्षेत्रात सुमारे ५०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त परदेशी व देशांतर्गत गुंतवणूक झाली आहे.

केंद्र सरकारने अंतराळ स्टार्टअप्ससाठी १,००० कोटी रुपयांचा व्हेंचर कॅपिटल फंड मंजूर केला आहे, ज्यामुळे तरुण उद्योजकांना आर्थिक पाठबळ मिळत आहे.सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत देशां तर्गत संरक्षणासाठी आणि हवामान बदलाच्या निरीक्षणासाठी सुमारे १,२०० कोटी रुपयांच्या खर्चातून खाजगी कंपन्यांच्या मदतीने १२ उपग्रहांचे जाळे (अर्थ ऑबसेर्व्हशन कॉन्स्टलेशन) उभारले जात आहे.

स्कायरूट एरोस्पेस: ही भारतातील पहिली अंतराळ युनिकॉर्न स्टार्टअप कंपनी बनली आहे. त्यांनी २०२२ मध्ये विक्रम-एस हे देशातील पहिले खाजगी रॉकेट यशस्वीरित्या प्रक्षेपित केले होते, आणि आता त्यांचे विक्रम-१ हे उपग्रह कक्षेत सोडणारे पहिले खाजगी व्यावसायिक रॉकेट प्रक्षेपणासाठी सज्ज आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटा येथील सतीश धवन सतीश अंतराळ केंद्रातून हे रॉकेट प्रक्षेपित केले जाईल या मोहिमेला मिशन आगमन असे नाव देण्यात आले असून यासाठी १२जुलै ते ४ऑगस्ट दरम्यानचा काळ निश्चित करण्यात आला आहे. भारताच्या अंतराळ कार्यक्रमाचे जनक डॉक्टर विक्रम साराभाई यांच्या नावावरून या रॉकेटचे नाव विक्रम -१ ठेवण्यात आले आहे. हे सात मजली उंच रॉकेट असून ते संपूर्णपणे भारतात खाजगीरित्या तयार केलेले पहिले ऑर्बिटल रॉकेट आहे. यापूर्वी २०२२ मध्ये स्काय रूट कंपनीने विक्रम एस या पहिल्या सब ऑर्बिटल रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण केले होते, मात्र विक्रम-१ हे उपग्रहांना पृथ्वीच्या कक्षेत पोहोचवणारे पहिले मोठे रॉकेट ठरणार आहे.

अग्नी कुल कॉसमॉस:

(अग्निकूल कॉसमॉस) या चेन्नईस्थित स्टार्टअप कंपनीने ३-प्रिंटेड रॉकेट इंजिन तयार करून त्याचे यशस्वी प्रक्षेपण केले आहे. त्यांच्याकडे स्वतःचा खाजगी लॉन्चपॅड देखील आहे.

पिक्सक्सएल : हायपरस्पेक्ट्रल इमेजिंग (हायपर्स्पेक्ट्राल इमॅजिन्ग ) उपग्रहांची मालिका तयार करणारी ही कंपनी आहे. त्यांनी फायरफ्लाय उपग्रह यशस्वीरित्या अवकाशात पाठवले असून त्यांचे डेटा विश्लेषण थेट नासा सारख्या संस्था वापरत आहेत.

ध्रुव स्पेस : उपग्रह प्लॅटफॉर्म्स आणि सॅटेलाइट लॉन्च सेवा पुरवणारी ही एक प्रमुख संस्था असून, त्यांनी एकाच वेळी अनेक उपग्रह निर्मितीची क्षमता विकसित केली आहे.

दिगंतरा : अंतराळातील कचऱ्याचा मागोवा घेणारी आणि उपग्रहांच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवणारी ही संस्था देखील वेगाने पुढे येत आहे.

मिशन आगमन अंतर्गत भारताचे तसेच आंतरराष्ट्रीय ग्राहकांचे उपग्रह अवकाशात पाठवले जाणार आहेत ही मोहीम केवळ एका रॉकेटचे उड्डाण नसून जागतिक अंतराळ बाजारात भारताच्या खाजगी कंपन्यांच्या प्रवेशाची घोषणा आहे स्काय रूट आणि अग्नी कुल कॉसमॉस सारख्या कंपन्यामुळे आता हाताचे खाजगी क्षेत्र ही उपग्रह प्रक्षेपणात मोठी भूमिका बजावण्यासाठी सज्ज झाले आहे येत्या काही आठवड्यात होणारे हे उड्डाण भारताच्या अंतराळ क्षेत्राला एका नव्या युगात घेऊन जाईल.

सध्या जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेत भारताचा वाटा सुमारे २ ते ३ टक्के आहे. खाजगी कंपन्यांच्या या आक्रमक शिरकावामुळे आणि कमी खर्चात उपग्रह सोडण्याच्या भारताच्या क्षमतेमुळे, २०३३ पर्यंत भारताची अंतराळ अर्थव्यवस्था ४४ अब्ज डॉलर्सवर पोहोचेल असा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे भारत केवळ उपग्रह प्रक्षेपक न राहता सॅटेलाइट डेटा, उपग्रह निर्मिती आणि अंतराळ तंत्रज्ञानाचा जागतिक हब बनत आहे.

# समाजाचे डोळे कधी उघडतील?


ज्योतिर्मय साहित्य

कधी मोठ्या अपेक्षांनी सासरी आलेली कुलवधू घरातील कटकटींना कंटाळून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलते, तर कधी सासू, सासरे, नणंद किंवा दीर तिच्या खुनाचा कट रचतात. याउलट, काही ठिकाणी मुलीच मुलाला फसवतात, त्याचाच जीव घेतात. अशा अत्यंत निर्दयी घटना घडताना पाहून मन सुन्न होते. अवघी २५२६ वर्षांची तरुण मुलं-मुली इतक्या क्रूरपणे मारली जात आहेत. आपण नेमके कुठे चाललो आहोत? आई-वडिलांचे संस्कार कमी पडत आहेत का? की पैसा, प्रतिष्ठा आणि लौकिक यांनाच आज सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे?




आजही अनेक ठिकाणी मुलीच्या आई-वडिलांकडून अवाजवी पैशांची अपेक्षा केली जाते. मोठमोठे विवाहसोहळे, कोट्यवधींचा खर्च, पाहुणचाराची स्पर्धा, अन्नाची नासधूस आणि तरीही काही ना काही कारणाने नाराजी व्यक्त केली जाते. या सर्वांवर समाजप्रबोधन कधी होणार?

प्री-वेडिंगच्या नावाखाली अनेकदा उथळ आणि दिखाऊ प्रकार केले जातात. बाळाच्या जन्माची चाहूल लागल्यापासून फोटोशूट, सातव्या महिन्याच्या ओटीभरणाचा भव्य कार्यक्रम... प्रत्येक गोष्ट सार्वजनिक प्रदर्शनाचा विषय झाली आहे. आयुष्यात काहीच वैयक्तिक राहणार नाही का? संस्कारांची जागा केवळ दिखाऊपणाने घेतली आहे का?




पहिले वाढदिवसही मोठ्या थाटामाटात साजरे होतात. हे सर्व केले नाही, तर आई-वडिलांनाच दोष दिला जातो. अशा परिस्थितीत मुलांना योग्य मूल्ये आणि संस्कार कसे द्यायचे?

काही ठिकाणी विवाहसंस्थेची व्याख्याच बदलत चालली आहे. अनेकांना लग्नापेक्षा रिलेशनशिप अधिक सोयीस्कर वाटते. आई-वडील नकोसे वाटले, तर वृद्धाश्रम आहेतच, अशी मानसिकता वाढताना दिसते. हे सर्व कधी बदलेल? समाजाचे डोळे कधी उघडतील? आणि पुढच्या पिढीला आपण नेमके कोणते संस्कार देत आहोत, याचा विचार कधी करू?

# मुलींनो, स्व-आत्मसंरक्षण स्व-जबाबदारी...

ज्योतिर्मय साहित्य

भारतीय संस्कृतीत मुलींना वा स्त्री जातीला लक्ष्मी रुप म्हणून ओळखल्या जात असले तरी तीच लक्ष्मी स्वरूप मुलगी वा स्त्री जात आज कुठेही सुरक्षित नाही. आजच्या बदलत्या सर्व गोष्टी व विकृत घटनांचा विचार करता असे लक्षात येते की, मुलींच्या बाबतीत ज्या घटना घडताहेत त्या पाहता मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहतो. जगाने कुठून कुठवर मजल मारली आहे. या बदलत्या धावपळीच्या जगात प्रत्येकाला स्वतः ला सिद्ध करून दाखवायचे आहे. मात्र मुलिंची बारी आली की, आधी प्रश्न तिच्या स्वप्न किंवा ध्येयाचा नाही तर ''सुरक्षितता'' याचा विचार केला जातो आहे किंवा काळजीपोटी करावा लागतो आहे.

आणि कांही ठिकाणी म्हणजे ग्रामीण भागात तर मुलींचे शिक्षण थांबवून त्यांना घरात बसवले जाते. कारण, तशा घटनाच मुलीच्या बाबतीत घडत आहेत. आजकाल मुलींच्या बाबतीत घडणाऱ्या घटना अतिशय जीवघेण्या व वेदनादायी आहेत.



मुलींच्या शाळा, ट्युशन, क्लासेस, ऑफिस इ. या वेळा सायंकाळी सात पर्यंतच सुरक्षित वाटतात. पण मोठ-मोठ्या शहरांमध्ये सर्रास या वेळा ९ ते १० पर्यंतच्या आखलेल्या असतात. मुलींना घरी जायला पाच मिनिटे जरी उशीर झाला तरी घरच्यांचा जीव भांड्यात पडतो, जीव कासावीस होतो. कारण, मुलींची काळजी हिच आई वडिलांची प्राथमिकता आहे किंवा असते म्हणून.

या सर्व गोष्टींचा विचार करता मुलींना कराटे, ज्युडो क्लास, व्यायाम याचे शिक्षण घेणे अगत्याचे ठरते आहे. मुली स्वतः आत्मसंरक्षणासाठी सज्ज असणे आज घडीला तरी फार आवश्यक आहे. कारण, प्रत्येक वेळी घरातील वडीलधारी मंडळी आपल्या सोबत असतातच असे नाही. म्हणून सायंकाळचे ट्युशन, क्लास, ऑफिस इ. संपवून घरी परतताना मुली स्वतःला सुरक्षित समजण्या एवढे तरी मुलींना बाह्य शिक्षण देणे गरजेचे ठरते आहे.


जोपर्यंत मुली स्वतः आत्मसंरक्षण करू शकणार नाहीत. तोपर्यंत त्या कोणत्याही गोष्टींना सामोरे जाऊ शकणार नाहीत. शाळेत या सर्व गोष्टींचे शिक्षण देणे आज खरं तर काळाची गरज म्हणावी लागेल. घराबाहेर असताना सतत चौकस बुद्धी ठेवावी, स्पर्श, नजरा, देहबोली, हातवारे, इतरांच्या या सर्व गोष्टींकडे कटाक्षाने नजर ठेवावी. आपण घराबाहेर असताना आपणच आपले संरक्षक असतो. हे विसरता कामा नये. त्यामुळे आपणच आपली काळजी घ्यावी. हीच आपली स्व जबाबदारी आहे.

निर्भया बलात्कार हत्याकांड, आरुषी बलात्कार हत्याकांड, कोलकाता नोबिता रेप केस. या अशा घटना घडणार नाहीत. याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. पण, दुर्दैवाने हे समाजातील कांही लोकांना समजत नाही. आणि परिणामी यामुळे निरपराध मुलींना याला बळी जावा लागतो.





समाजातील सर्वांनीच मुलींच्या सर्व प्रश्नांकडे, मुलींच्या बाबतीत घडणाऱ्या घटनांकडे, मुलींच्या सुरक्षिततेकडे आपली सामाजिक जबाबदारी म्हणून पाहण्याचा प्रयत्न किंवा सकारात्मक दृष्टीकोन जरी बनवला तरी मुली सुरक्षित राहतील यात तिळमात्र शंका नाही. हे म्हणने वावगे ठरणार नाही.

सद्य स्तिथीत मुलींच्या बाबतीत घडणाऱ्या घटनांचा विचार करता मुलींनी स्वतःची नीट काळजी घ्यावी. प्रवासा दरम्यान आपण सतर्क रहावे. आपल्या प्रत्येक गोष्टींची जबाबदारी हीच आपली प्राथमिकता असावी. लेडीज हेल्पलाइन नंबर. हा नंबर सदैव आपल्या मोबाईल मध्ये सेव्ह असावा. जेणेकरून अडी-अडचणीच्या वेळी हा नंबर आपण पटकन डायल करू शकू. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचाही आपल्याला नीट सखोल अभ्यास असावा, आज मुलींना कराटे क्लास लावणे खरंच अगत्याचे आहे. कारण, जोपर्यंत मुली स्ट्रॉंग बनणार नाहीत तोपर्यंत मुली, बायका स्वतःचे संरक्षण करू शकणार नाहीत. म्हणून परिस्थिती कोणतीही असो आपण सतर्क असणे महत्वाचे असते. स्व-आत्मसंरक्षण स्व- जबाबदारी हे लक्षात ठेऊनच स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतः सदैव तत्पर असावे.



## जात्यावरच्या ओव्या......

आले दिस पेरणीचे
धनी सावकारा घरी
माय माती मोलाची
करतो कर्जान बरोबरी ||७३५||

एका मायचे लेकर
बहीण भाऊ झाले
एका ताटामंधी घास
माऊलीन भरवले ||७३६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ४८


ज्योतिर्मय साहित्य

अशी भक्ती आणि विरक्ती अंगात भिनली पाहिजे. आपण सर्वसामान्य माणसे आहोत परंतु संतांनी दाखवलेल्या या मार्गावर वाटचाल तर करू शकतो ! माझ्या प्रपंचासाठी आवश्यक तेवढे धन मी मिळवीन. इतरांचे धन किंवा पैसा माझ्यासाठी मृत्तिकेसमान असेल. परस्त्रीकडे मी माता किंवा भगिनी म्हणून पाहीन. या गोष्टी तर आपल्याला सहज करता येण्यासारख्या आहेत.

ज्याप्रमाणे आपल्या देशाबद्दल बोलताना आपण म्हणतो की आपल्या देशात अनेकतेत एकता आहे. त्याप्रमाणे परमेश्वराची विविध रूपे आणि विविध नावे असली तरी चैतन्यरूपी असलेला तो परमेश्वर एकच आहे. अनेक संतांनी हे सत्य एकमुखाने सांगितले आहे. गीतेत श्रीकृष्णाने सांगितले आहे की ज्याप्रमाणे विविध नद्या एकाच समुद्राला येऊन मिळतात त्याप्रमाणे विविध देवदेवतांना केलेली प्रार्थना माझ्यापर्यंत येऊन पोहोचते. पण आम्ही सामान्य माणसे हे समजून घेताना गोंधळ करतो. देवामध्ये कोण श्रेष्ठ, कोण कनिष्ठ अशा प्रकारचा भेदभाव करत बसतो.

स्थुलाकडून सूक्ष्माकडे तशी सगुणाकडून निर्गुणाकडे आपली वाटचाल झाली पाहिजे. भगवंताचा श्रेष्ठ भक्त ही गोष्ट जाणून असतो. निर्गुण निराकाराप्रती त्याची श्रद्धा असते. परंतु तरी देखील सर्वसामान्यांच्या मनामध्ये भगवंताबद्दल विश्वास निर्माण व्हावा आणि त्यांचीही वाटचाल सगुणाकडून निर्गुणाकडे व्हावी अशी त्याची इच्छा असते म्हणूनच तो सगुणाची देखील पूजा करतो.






असे करताना त्याच्या मनामध्ये कोणतीही शंका किंवा कोणताही भ्रम असत नाही. मंदिरात अंतरात तोच नांदत आहे हे तो जाणून असतो. असा भक्त भगवंताचा त्या सर्वोत्तमाचा श्रेष्ठ भक्त होय.

स्वसंवाद

१. माझ्या बोलण्यात आणि वागण्यात एकवाक्यता आहे का? मी इतरांना जे सांगतो ते स्वतः पाळतो का, याचा मी कधी प्रामाणिकपणे विचार केला आहे का?

२. परमेश्वराची विविध रूपे पाहताना माझ्या मनात श्रेष्ठ-कनिष्ठाचा भेद येतो का? ''अनेकी एक'' हे तत्त्व माझ्या उपासनेत उतरले आहे का?

३. संतांच्या निरपेक्ष वृत्तीचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून माझ्या दैनंदिन जीवनात मी एखादी तरी गोष्ट निरपेक्षपणे करतो का?

४. सगुण उपासना करताना माझ्या मनात शंका, भ्रम किंवा न्यूनगंड येतो का? माझी श्रद्धा अविचल आहे का?

५. ''सर्वोत्तमाचा दास'' होण्याच्या दिशेने माझी वाटचाल सुरू आहे असे मला वाटते का?

(क्रमशः)

## ॥ अभंग-माधव ॥





माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

### निघाली वारी पंढरीला

पंढरी दिशेने । निघाली ही वारी ।
वारकरी उरी । आनंदले ॥१॥
आता भेटणार । विठोबा आम्हाला ।
मोद गगनाला । पोचलाय ॥२॥
विठ्ठल विठ्ठल । नामाचा गजर ।
भक्तीचा बहर । फुललाय ॥३॥
माधव हा म्हणे । प्रथा ही वारीची ।
आठ शतकांची । अव्याहत ॥४॥

## ॥ संजय उवाच... ॥




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ देव

देव हे एक श्रद्धास्थान आहे, आपली ज्याच्यावर श्रद्धा असते ते स्थान आपल्यासाठी देव असते, श्रद्धेवीन फलप्राप्ती नाही त्यामुळे आपण श्रद्धाळू पाहिजे म्हणजे सर्व कामात आपल्याला योग्य दिशा मिळते.

## काळजीचे मूळ कर्तेपणात आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आनंद पाहायला आपल्याला दुसरीकडे कुठे जावे लागते का ? नाही. जो स्वत:च आनंदरूप आहे त्याने आपण होऊन ' मी दु:खी आहे ' असे मानून घेतले आहे. एकजण आपले तोंड आरशात पाहायला गेला, पण त्याला ते दिसले नाही. त्यावर दुसरा एकजण म्हणाला, ' मी दाखवितो. ' असे म्हणून आरशावर मळ बसला होता तो पुसून, त्याने आत पाहायला सांगितले, तेव्हा तोंड स्वच्छ दिसले. त्याचप्रमाणे साधू लोक करीत असतात. ते आपल्याला सांगत असतात की, तूच ब्रह्मरूप आहेस; म्हणजे तू स्वत:सिद्ध आणि आनंदरूप आहेस. परंतु आपण काय करतो, की हा प्रपंच माझा आहे असे समजतो, आणि त्यामुळे त्यांतले सर्व सुखदु:ख आपण आपल्यावर लादून घेतो. ज्याने तो उत्पन्न केला त्याला तो रक्षण करण्याची शक्ती असते आणि तो ते आपल्या इच्छेप्रमाणे करीतही असतो; पण तिथे आपल्यावर कर्तेपणा ओढून घेऊन आपण सर्व काळजी करीत बसतो. वास्तविक आपल्या हाती काय आहे ? परमात्म्याला काय करायचे ते तो करीत असतो, आपण मात्र काळजी करून शीण करून घेत असतो. म्हणूनच काळजी सोडून देऊन आपण भगवंताला शरण होऊन राहावे. आपण त्याचे होऊन राहिले म्हणजे आपल्याला सुखदु:ख होत नाही, आणि मग आपल्याला त्या आनंदाचा लाभ मिळतो.

काळजी ही मोठी विलक्षण असते. एका माणसाला आपल्या मुलाला चांगली नोकरी लागावी याची काळजी होती. पुढे त्याच्या मनाप्रमाणे नोकरी लागल्यावर, त्या मुलाच्या लग्नाची काळजी सुरू झाली. काही दिवसांनी लग्न झाले; मग पुढे सून चांगली वागत नाही म्हणून काळजी लागली. नंतर तिला मूल होईना म्हणून काळजी लागली. काही दिवसांनी तिला मूल झाले; त्या मुलाला फिट येऊ लागली म्हणून त्याला काळजी लागली. शेवटी आणखी काही दिवसांनी मुलाची फिट बरी झाली. पण त्या म्हाताऱ्यालाच फिट्स् येऊ लागल्या, आणि अखेर काळजी करीत करीतच तो मरून गेला. काळजी ही आपल्याला भगवंतापासून खरेच काळाच्या स्वाधीन करते. आपण काळाच्या स्वाधीन झालो की आपली बुद्धी भ्रष्ट होते. खरे म्हणजे काळजीचे मूळ माझेपणात आणि कर्तेपणात आहे, आणि खुद्द कर्तेपणाचे मूळ भगवंताच्या विस्मरणात आहे. व्यवहारी माणसे मोठी हुशार असतात; भगवंताला साक्षी ठेवून काळजी करतात ! हा तर त्याच्याहिपेक्षा मोठा गुन्हा आहे. ' काळजी लागणे स्वाभाविक आहे ' ही कल्पनाच आधी आपण मनातून काढून टाकली पाहिजे. आपली काळजी का सुटत नाही ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. काळजीने आपल्याला धरण्याच्या ऐवजी आपणच काळजीला घट्ट धरून ठेवतो, मग ती सुटणार कशी ? ज्याने भगवंत आपलासा करून घेतला त्याला काळजीचे कारण उरत नाही.

संकट आले तर काळजी करू नये. भगवंत करतो ते आपल्या हिताचे करतो ही दृष्टी ठेवावी.

***

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

### आपले सण,आपलेउत्सव वट सावित्री पोर्णिमा

पुढे.......

त्याने कसलासा पाश सत्यवानावर टाकला व सत्यवानाचे प्राण त्या फासा सोबत त्या इसमाकडे म्हणजेच यमाकडे गेले. यम पुढे चालू लागला. त्या पाठोपाठ सावित्रीही चालायला लागली. सावित्रीने त्यांना विचारले की, हे प्रभू आपण कोण आहात? तेव्हा त्याने सांगितले की, मी यम आहे. सावित्री त्यांना म्हणाली की, मी असे ऐकले आहे की, तुमचे दूत येऊन प्राण हरण करतात. मग आजच तुम्ही स्वत: माझ्या पतीचे प्राण हरण करण्यासाठी का आलात? तेव्हा धर्मराजाने सांगितले की, याला दोन कारणे आहेत. हा सत्यवान पूर्वजन्मीचा योगेश्वर आहे म्हणून, व नारदाने मला स्वत:ला जायला सांगितले म्हणून, मी इथे आलो आहे. सावित्री यमाच्या सोबत चालायला लागली. यम म्हणाला, तू माझ्यासोबत का चालते आहेस? तेव्हा सावित्री म्हणाली, मी तुमच्यासोबत येत नाही तर, मी माझ्या पतीसोबत चालत आहे. पतीसोबत चालणे हे पत्नीचे कर्तव्यच आहे. आणि मी ते करणार.

(क्रमश:)

## सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### चौथा ऋतू"जिव्हाळा

आपल्या जीवनात उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तिन ऋतू फारपरिणामकारक आहेत. या तिनही ऋतूचा मानवाशी-त्याच्या जीवनासी तसेच सुखदु:खासीही संबंध आहेच कारण ऊन पाणी हवा याशिवाय जीवन कसे चालेल.
आता पाऊस कसा सर्वत्र धूम
करत आहे! पण इथंएक सहज विचार मला सुचला की आपण उन्हाळा पावसाळा हिवाळा जसे आवश्यक मानतो तसे माणसा-माणसा तील नातं, सुखदुःख, भाव-भावना, विचार, मदत सहकार्य
एकमेकाचे ओझे हलकं करण यासाठी "जिव्हाळा" हा माणून जीवन जगलेतर? तर खूपच चांगले होईल! असे मला वाटते.. कारण मी स्वतः आणि माझ्या सर्व नातलगाने मिळून (जे यात सामील झाले) आम्ही "जिव्हाळा" मंडळ सुरू करून महिन्यांनी मिटींग घेत असू. यात भेटीगाठी, गप्पाबरे वाईट अनुभव शेअर करत असतो. त्यांचे परिणाम चांगले दिसले! तर असो असा जिव्हाळा आजकमी होत आहे. यावरून "जिव्हाळा" शब्दा वरून सहज वाटलेआपल्या मराठी भाषेत खूपशब्द (शेदिडशे) शेवटी हे अक्षर असलेले (2,3,4,5 अक्षरी आहेत व ते महत्वपूर्ण आहेत, अर्थपूर्ण, जीवनासी खूप संबधीत आहेत ते ईतर कोणत्याही भाषेत नाहीत.ऊ.बघा..आनंद घ्या.. वाचा.. जे आपणरोज बोलतो वापरतो. पण आपण ते गंभीरपणे घेत नाही. हे शब्द फक्त आणि फक्त माय मराठीतच आहे..
शाळा फला मला काळा डोळा बैलपोला पला, घोटाळा, मुळा मुगंला,
ढोकला, आवला, सोहळा, गोधंळा,
मावळा, पन्हाळा, पिवळा, पाला पाचोळा, आगळा वेगळा.. फक्त आनंद व माहितीसाठी याशब्दाचे महत्व व पुराण थांबवतो. गूड़ डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि ईथे थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.



## आरोग्य संजीवनी

### बदामाचे फायदे

ज्योतिर्मय साहित्य

१. भिजवलेले बदाम सकाळी खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम हे जास्त पौष्टिक असतात.

२. बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपतांना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

३. बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

४. डाएटिंग करणारी लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करते.

५. बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

६. मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेवल नियंत्रणात राहते.

७. संशोधनादरम्यान स्पष्ट झालं की, दररोज मुठभर बदाम खाल्ल्यास हृद्याचे आजार कमी होतात. बदाम खाल्ल्यानं हृदयाच्या रक्तवाहिन्यांचा रक्तप्रवाह नीट होतो.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

८. बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते. जे रक्त शुध्दीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

९. बदामामुळे कोरडी त्वचा असणाऱ्यांना त्वचेचा स्निग्धपणा वाढवण्यास मदत होते.

१०. बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### पालखी निघाली

रंगीबेरंगी फुलांची सजावट
सर्वांचे मन मोहवते
भक्तीरंग चौफेर दरवतो
टाळ,चिपळी,मृदंगासह
पालखी निघाली पंढरी
सान थोर नाचतो

पालखी निघाली पहा
विठू भेटीसाठी आनंदे
सोहळा रंगला छान
हाती वैष्णव पताका
अन् मुखी असे
हरी नामाचा मान

# भारत बापूराव जाधव यांना राज्यस्तरीय वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्रदान

## ताडपिंपळगाव आणि कन्नड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा; मुंबईत झाला दिमाखदार सोहळा

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – कन्नड तालुक्यातील ताडपिंपळगाव येथील प्रगतशील आणि प्रयोगशील शेतकरी भारत बापूराव जाधव यांना महाराष्ट्र शासनाचा अत्यंत प्रतिष्ठेचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार नुकताच मुंबईत एका भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला. राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने दरवर्षी शेती क्षेत्रात उल्लेखनीय, नावीन्यपूर्ण आणि आदर्श कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या राज्यस्तरीय सन्मानामुळे ताडपिंपळगावसह संपूर्ण कन्नड तालुका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिरपेचात




मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**१ जुलै रोजी मुंबईत झाला गौरव**

कृषी दिनाचे औचित्य साधून १ जुलै रोजी मुंबई येथे एका विशेष दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात माननीय राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते भारत जाधव यांना हा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. स्मृतीचिन्ह, मानपत्र आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**आधुनिक तंत्रज्ञान आणि कष्टाचे फळ**

श्री. भारत जाधव यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अतिशय प्रभावी वापर आपल्या शेतीत केला आहे. कमी खर्चात आणि उपलब्ध साधनसामग्रीत जास्तीत जास्त शाश्वत उत्पादन कसे घ्यावे, याचे उत्तम उदाहरण त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांसमोर ठेवले आहे. शेतातील विविध प्रयोग, जलसंधारणाचे नियोजन आणि सातत्यपूर्ण परिश्रमांची दखल घेत शासनाने त्यांना या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले आहे.

**परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव**

भारत जाधव यांनी हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार स्वीकारल्याची बातमी आणि छायाचित्रे समोर येताच ताडपिंपळगाव आणि कन्नड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा मोठा वर्षाव होत आहे.

# शेवटचा निर्णय (लघुकथा)

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुण्यातील एका मोठ्या रुग्णालयात साठीतले अनिल देशमुख गेल्या काही महिन्यांपासून अंथरुणाला खिळले होते. त्यांना असाध्य आजार झाला होता. शरीर हळूहळू साथ सोडत होतं, पण वेदना मात्र दिवसेंदिवस वाढत होत्या.

त्यांची मुलगी सायली रोज त्यांच्या शेजारी बसून त्यांचा हात धरून असायची.

''बाबा, तुम्ही लवकर बरे व्हाल. काळजी करू नका.'' ती बाबांना म्हणायची. पण हे म्हणतांना तिच्या डोळ्यांमध्ये आलेले पाणी लपवायची.

अनिल हलकेच हसायचे, पण त्या हसण्यात आशा कमी आणि वेदना जास्त असायच्या.

एक दिवस डॉक्टरांनी सायलीला बाजूला घेऊन सांगितलं,

''सायली,आता तुझ्या बाबांना उपचारांनी फारसा फरक पडणार नाही. आपण फक्त त्यांना आता जास्तीत जास्त आराम द्यायला हवा.''

त्या रात्री अनिलांनी सायलीला जवळ बोलावलं.

''सायली मला तुझ्याशी एक महत्त्वाचं बोलायचं आहे,'' त्यांनी थरथरत्या आवाजात म्हटलं.


''काय बाबा?''

''मी खूप थकलोय या वेदनांपासून मुक्त व्हायचं आहे मला.''

सायलीच्या पायाखालची जमीन सरकली.

''बाबा, तुम्ही असं कसं बोलू शकता? आम्ही आहोत ना तुमच्यासोबत!'' ती म्हणाली.

अनिलांनी तिचा हात घट्ट पकडला.



''मला जगायचं होतं पण असं खितपत पडून नाही. मला सन्मानाने निरोप घ्यायचा आहे.'' ते तुटक तुटक बोलू लागले. एवढे बोलतांना त्यांना ग्लानी आली. ते निपचित पडून राहिले.

अशातच एक दिवस घरी सायलीला बाबांच्या कागदपत्रांमध्ये एक ''लिव्हिंग विल'' सापडली. त्यात त्यांनी स्पष्ट लिहिलं होतं

''जर मी कधी अचेतन अवस्थेत गेलो, आणि माझं आयुष्य फक्त यंत्रांवर टिकून असेल, तर मला कृत्रिमरीत्या जिवंत ठेवू नका.''

सायलीसमोर मोठा प्रश्न उभा राहिला बाबांची इच्छा मान्य करायची की त्यांना जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करत राहायचे?

तिच्या मनाची ही अवस्था पाहून डॉक्टरांनी तिला समजावलं,

''हा निर्णय सोपा नाही. पण त्यांच्या इच्छेचा आदर करणंही तितकंच महत्त्वाचं आहे.''

✍ उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर
मो.८८८८९२५४८८



त्या रात्री सायली रात्रभर झोपली नाही. तिच्या डोळ्यासमोर लहानपणीचे बाबा उभे राहिलेतिला सायकल शिकवणारे, शाळेत सोडायला जाणारे, तिला खांद्यावर घेऊन यात्रेत नेणारे, तिच्यासाठी प्रत्येक गोष्ट करणारे,

''जर आज बाबा बोलू शकले असते, तर ते काय म्हणाले असते?'' तिने स्वतःलाच विचारलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी सायलीने एक ठाम निर्णय घेतला.

डॉक्टरांच्या समितीसमोर तिने शांतपणे सांगितलं,

''माझ्या बाबांची इच्छा मला मान्य आहे. त्यांना शांतपणे जाऊ द्या. मला त्यांचा त्रास बघवत नाही.''

काही तासांनंतर, यंत्रांची संख्या कमी झाली आणि वातावरणात एक विचित्र शांतता पसरली.

सायली बाबांचा हात हातात घेऊन बसली होती.

''बाबा, मी तुमच्यावर खूप प्रेम करते, पण तुमच्या इच्छेनुसार मला हा कठोर निर्णय घ्यावा लागला.'' ती हलक्या आवाजात म्हणाली. तिचा आवाज त्यांच्यापर्यंत पोचला किंवा नाही हे तिला समजले नाही परंतु

अनिलांच्या चेहऱ्यावर हलकंसं स्मित उमटलं जणू ते म्हणत होते

''धन्यवाद, मला समजून घेतल्याबद्दल.''

काही क्षणांतच सर्व काही शांत झालं.

सायलीच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते, पण मनात एक समाधान होतं

तिने बाबांना फक्त जिवंत ठेवण्याचा नाही, तर सन्मानाने निरोप देण्याचा निर्णय घेतला होता.




## EMI चे चक्रव्यूह

"वयाच्या २३ व्या वर्षी खिशात पगार येतोय २५ हजार... आणि EMI चाललाय २० हजार! मित्रा, तू कमावतोयस की फक्त बँकांचे खिसे भरतोयस? जर तुम्हीही या वयात EMI च्या चक्रव्यूहात अडकला असाल, तर हा व्हिडिओ शेवटपर्यंत नक्की बघा!"

"वयाच्या २३-२४ व्या वर्षी नवीन नोकरी लागली की, महागडा आयफोन, बाईक किंवा ब्रँडेड कपडे EMI वर घेण्याची फॅशन झालीये. पण विचार करा, ज्या वयात तुम्हाला 'कंपाउंडिंग' (Compounding) ची ताकद वापरायची आहे, त्या वयात तुम्ही 'व्याज' भरण्यात स्वतःचे भविष्य वाया घालवत आहात."

आणि हे व्याज किती भयानक दराने आकारले जाते याचा काही अंदाज तुम्हाला आहे का. मित्रांनो सर्वसाधारणपणे दहा टक्के ते 45 टक्के या व्याज दराने क्रेडिट कार्ड कंपन्या पर्सनल लोन कंपन्या कर्ज देत असतात. (क्रमशः)

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बाबा' (सह्याद्रीची ढाल)

पुढे......

'आमचा बाप आणि आम्ही' या पुस्तकात डॉ. नरेंद्र जाधव यांचे अशिक्षित वडील त्यांना जे मोलाचे मार्गदर्शन करतात, ते प्रत्येकाला अंतर्मुख करणारे आहे. ते म्हणतात, "तू काय बी कर, काय बी शिक; पण जे काय करशील त्याच्यात टॉपला जा!" गायनाच्या क्षेत्रातील इतिहास ज्यांच्या नावाशिवाय कधीच पुढे जाऊ शकत नाही, अशा मंगेशकर भावंडांना आणि विशेषतः गानकोकिळा लता मंगेशकरांना स्वरांचे बाळकडू देऊन घडवणारे त्यांचे वडील मास्टर दीनानाथच होते!

साहित्याच्या आणि सिनेमाच्या पडद्यावरही या नात्याची अथांगता नेहमीच अधोरेखित झाली आहे. ' शोले ' चित्रपटात जेव्हा तरुण मुलगा अकाली मृत्यू पावतो आणि तिथे त्याचे वृद्ध, अंध वडील (अभिनेते ए. के. हंगल) येतात, तेव्हाचा तो प्रसंग आणि त्यांचा संवाद काळीज चिरून टाकणारा आहे. ते अत्यंत कातर स्वरात म्हणतात—

"जानते हो दुनिया का सबसे बडा दुःख क्या होता हैं? बाप के कंधे पर बेटे का जनाजा." काळीज विदीर्ण करून टाकणारे हे शब्द आहेत!

'कुंवारा बाप' चित्रपटात आपल्याला सापडलेल्या एका अनाथ मुलाला जीवापाड जपणारा मेहमूद आठवा... त्या मुलाला पोलिओच्या आजारातून वाचवण्यासाठी तो जे रक्ताचं पाणी करतो, त्याचं वर्णन कोणत्या शब्दात करावं? तो प्रसंग पाहताना नकळत आपल्या डोळ्यातून पाणी आल्याशिवाय राहत नाही. अगदी त्रेतायुगात डोकावले, तर कैकयीला दिलेल्या वचनामुळे प्रभू रामाला जेव्हा वनवासात जावे लागते, तेव्हा पिता असलेल्या दशरथ राजाचा शोक हृदय पिळवटून टाकणारा आहे. हा कर्तव्यनिष्ठ पिता शेवटी केवळ पुत्रशोकातच आपले प्राण सोडतो. गीत रामायणात श्रीराम आणि लव-कुश यांच्या भेटीचा प्रसंग अत्यंत अद्भुत रीतीने वर्णन केला आहे. 'कुश लव रामायण गाती' हे गीत ऐकलं की डोळे भरून येतात. क्रमशः.......

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### स्वस्थानशोभा ।

पुढे

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥

स्वधर्माने आणि आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडल्यानेच सिद्धी प्राप्त होते.

■ ३. वाणिज्यं व्यवहारेषु

व्यापाराचा पाया म्हणजे सत्य, न्याय आणि विश्वास. भगवद्गीता (१८.४४)

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्॥

व्यापार हा वैश्याचा स्वाभाविक धर्म सांगितला आहे. तो प्रामाणिक व्यवहारातच शोभतो; फसवणूक किंवा अन्यायात नव्हे.

■ ४. स्त्री दिव्या शोभते गृहे

या ओळीचा अर्थ स्त्रीला घरापुरती मर्यादित करणे असा नसून, सद्गुणी गृहिणी किंवा स्त्री ज्या घरात असते, त्या घराला ती मंगलमय करते, असा आहे.

मनुस्मृती मध्ये प्रसिद्ध वचन आहे—

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः॥ (३.५६)

ज्या घरात स्त्रीचा सन्मान होतो, तेथे देवतांचा वास असतो.

तसेच - गृहिणी गृहमुच्यते।
(महाभारतप्रसिद्ध वचन)

गृहिणीमुळेच घराला "घरपण" प्राप्त होते.

स्वस्थानशोभेचा व्यापक सिद्धांत भगवद्गीता (३.३५)

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः॥

स्वतःचे योग्य कर्तव्य अपूर्ण असले तरी श्रेष्ठ आहे; दुसऱ्याचे कार्य स्वीकारणे भयावह आहे.

हा श्लोक सांगतो की योग्य व्यक्तीने योग्य कार्य योग्य स्थानी करणे हेच जीवनातील संतुलनाचे रहस्य आहे.

"स्वस्थानशोभा" हा भारतीय तत्त्वज्ञानातील अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे. प्रेम योग्य पात्रात, सेवा योग्य अधिकारात, व्यापार प्रामाणिक व्यवहारात आणि सद्गुणी स्त्रीच्या उपस्थितीने गृहस्थाश्रम मंगलमय होतो.

याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने आपला स्वधर्म, आपले कर्तव्य आणि आपले योग्य स्थान ओळखून आचरण केल्यास समाजात सुव्यवस्था, सौंदर्य आणि समन्वय निर्माण होतो.

जय जय रघुवीर समर्थ 🙏

कृतज्ञ मी कृतार्थ मी
भगवंत हृदयस्थ आहे 🙏
अपर्णा परांजपे कात्रज पुणे

## दिंडी – चालतं प्रेमाचं कुटुंब



अमोल बोरीकर



पहाटेची वेळ... पावसाच्या हलक्या सरी अंगावर झेलत दिंडी पुढे सरकत असते. कोणाच्या हातात टाळ, कोणाच्या खांद्यावर भगवी पताका, तर कोणाच्या ओठांवर अखंड "विठ्ठल... विठ्ठल..."चा गजर. त्या हजारो माणसांच्या गर्दीत कुणाचं आडनाव विचारलं जात नाही, कुणाची जात विचारली जात नाही, कुणाच्या खिशात किती पैसा आहे हे पाहिलं जात नाही. फक्त एकच प्रश्न असतो—"माऊली, दमलात का? पाणी घेणार का?" आणि त्या एका प्रश्नात संपूर्ण मानवतेचा धर्म सामावलेला असतो.

दिंडी म्हणजे चालणारी माणसं नव्हेत; ती चालणारं प्रेम आहे. एका आईने केलेली भाकरी दुसऱ्याच्या लेकराच्या हातात जाते, एका आजोबांची काठी दुसरा तरुण प्रेमाने धरतो, एखादा वारकरी थकून बसला तर संपूर्ण दिंडी त्याच्यासाठी थांबते. कारण येथे प्रत्येकाचे दुःख स्वतःचे असते आणि प्रत्येकाचा आनंदही आपलाच असतो. दिंडी म्हणजे फक्त वारकऱ्यांचा समूह नाही; ती चालतं प्रेमाचं कुटुंब आहे. येथे जात नाही, धर्म नाही, श्रीमंती-गरीबी नाही, उच्च-नीच नाही. येथे फक्त एकच ओळख असते—विठ्ठलाची लेकरं. म्हणूनच दिंडीत कुणी उपाशी राहत नाही, कुणी एकटा चालत नाही आणि कुणाचे अश्रूही एकटे गळत नाहीत.

दिंडीतल्या या अथांग प्रेमाचे वर्णन करताना संत तुकाराम महाराज म्हणतात:

"हेचि माझे घर हेचि माझे गोत। विठ्ठल पंढरीनाथ मायबाप॥"

संत ज्ञानेश्वर यांनी "अवघाचि संसार सुखाचा करीन" हे स्वप्न पाहिलं आणि तुकाराम यांनी माणुसकीला भक्तीची दिशा दिली. त्या स्वप्नाचं जिवंत रूप म्हणजे ही दिंडी.

रक्ताच्या नात्यांना लाजवेल असं हे प्रेमाचं नातं फक्त आणि फक्त दिंडीतच पाहायला मिळतं. जग ज्यांना एकटं पाडतं, त्यांना ही दिंडी आपल्या पंखाखाली घेते.

दिंडी आपल्याला शिकवते की कुटुंब म्हणजे फक्त एकाच छताखाली राहणारे लोक नव्हेत; तर एकमेकांचा भार उचलणारी, दुःख वाटून घेणारी आणि आनंद दुप्पट करणारी माणसं. जिथे प्रत्येकाच्या ओठांवर विठ्ठलाचं नाव आणि हृदयात दुसऱ्यासाठी माया असते, तिथेच खऱ्या अर्थाने देव वसतो.

दिंडी ही पायांनी चालत नाही... ती हजारो हृदयांच्या ठोक्यांवर चालते. आणि त्या प्रत्येक ठोक्यात विठ्ठल प्रेम, समता आणि माणुसकीचं अखंड नाम लिहित असतो.

# पावसाळ्यात प्रशासनाच्या विविध विभागाचे कर्तव्य

ज्योतिर्मय साहित्य

पाऊस, वादळ वारा, पूर, झाडे उन्मळून पडणे, दरड कोसळणे, रस्ते वाहून जाणे, वीज सेवा खंडित होणे या बाबीपासून सुरक्षित राहण्यासाठी प्रशासनाच्या सर्व विभागानी व नागरिकांनी ही सतर्क राहिल्यास जीवित हानी निश्चितच थांबू शकते. प्रशासनाच्या पालिका विभागातील स्वच्छता विभागाने व ग्रामीण भागातील नगर पंचायत किंवा ग्राम पंचायतीच्या स्वच्छता विभागाने गटारीत तुंबलेला कचरा काढून गटारी किंवा जमिनी खालील गटारी मोकळ्या केल्या तर पावसाचे पाणी तुंबणार नाही व पाण्याचा निचरा चटकन होईल यामुळे घरात पाणी शिरणार नाही.मोडकळीस आलेल्या घर मालकांना सूचना देऊन ती घरे तात्काळ खाली करून घ्यावी.शहर व ग्रामीण भागात उंचच उंच झाडे, किंवा धोकादायक झाडे यांची छाटणी करावी. वीज वितरण विभागाने ढिले झालेले विजेचे खांब बदलावे,विजेच्या तारांजवळ झाडाच्या वाढलेल्या फांद्या तोडाव्यात,



पावसाळ्याच्या दिवसात वीज खांबात वीज प्रवाह उतरतो म्हणून एक निरीक्षक पथक नेमून पाहणी करावी. रस्त्यांच्या कडेला मोठं मोठ्या खड्ड्यात पाणी तुंबलेले असते, या मुळे दोन चाकी वाहन अपघात होऊ शकतो, हे साचलेले पाणी त्वरित काढावे व खड्डे बुजवावे,जलसंपदा व पाटबंधारे खात्याने धरणाच्या क्षमतेचा वारंवार आढावा घ्यावा, धरणातील पाणी सोडण्याआधी नदी किंवा ओढ्यांच्या काठावरील रहिवाश्यांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात. शासनाची संपर्क यंत्रणा पोलीस, ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक, पोलीस पाटील, कोतवाल यांना सतर्क राहण्यास सांगून गंभीर परिस्थिती उदभवल्यास त्वरित वरीष्ठाशी तालुका व जिल्हा संपर्क साधण्याच्या सूचना यांना द्याव्यात.



धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४


स्वयं सेवी व सेवा भावी संस्था, मंडळे, समाज

कार्यकर्ते यांनी ही पावसाने गंभीर स्थिती निर्माण झाल्यास मदतीसाठी पुढे गंभीर स्थिती निर्माण झाल्यास मदतीसाठी पुढे यावे. शासनाच्या आरोग्य विभागाने ही आपत्कालीन स्थिती उदभवल्यास सतर्क रहावे.एस. टी.महामंडळच्या बसेस चालकांनी पुलावरून पाणी वाहत असतांना आततायी किंवा उताविळपणा व अति आत्मविश्वास दाखवून बस पुराच्या पाण्यातून  नेण्याचा प्रयत्न करू नये. काही शौकीन सेल्फी काढण्यासाठी पुराच्या पाण्याला पाहण्यासाठी नदी काठी जातात, धबधबा पाहण्यासाठी डोंगर, दऱ्याच्या ठिकाणी जातात व तेथे सेल्फी काढतात, व सेल्फी किंवा रिल्स बनविण्याच्या नादात पाण्यात पडतात व प्रवाहासोबत वाहून जातात. असे प्रकार टाळायला हवे. ही सर्व खबरदारी घेतली तर जीवित हानी टळू शकते.

# मुला मुलींचे वाढते वय, वाढलेल्या अपेक्षा आणि विवाह संस्था

ज्योतिर्मय साहित्य

आजच्या समाजात विवाहसंस्था एका महत्त्वाच्या वळणावर उभी आहे. एकेकाळी आयुष्यभर टिकणारा पवित्र बंध म्हणून ओळखली जाणारी ही संस्था आता अनेक सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक बदलांमुळे नव्या स्वरूपात दिसू लागली आहे. वाढते शिक्षण, करिअर, आर्थिक स्वातंत्र्य, शहरीकरण आणि बदलती जीवनशैली यामुळे लग्नाचे वय वाढत आहे. त्याचबरोबर जोडीदार, नाते आणि वैवाहिक जीवनाबाबतच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. या बदलांचा समाजावर दूरगामी परिणाम होत आहे.

पूर्वी कमी वयात विवाह होणे ही सामाजिक परंपरा होती. आज उच्च शिक्षण, करिअरमध्ये स्थिरता, आर्थिक स्वावलंबन आणि स्वतःची ओळख निर्माण करण्याची इच्छा यामुळे युवक-युवती उशिरा विवाह करण्यास प्राधान्य देत आहेत. अनेकांसाठी विवाह हा जीवनाचा प्रारंभ नसून, आयुष्याचा एक विचारपूर्वक घेतलेला निर्णय बनला आहे.

आज विवाह केवळ दोन व्यक्तींचे मिलन राहिलेले नाही; तो दोन व्यक्तिमत्त्वांच्या, स्वप्नांच्या आणि



जीवनशैलीच्या अपेक्षांचा संगम झाला आहे. जोडीदार समंजस, आर्थिकदृष्ट्या सक्षम, भावनिकदृष्ट्या परिपक्व, आकर्षक, करिअरमध्ये यशस्वी आणि कुटुंबवत्सल असावा, अशी अपेक्षा वाढली आहे. सामाजिक माध्यमांवर दिसणाऱ्या ''परिपूर्ण'' आयुष्याच्या प्रतिमांमुळे वास्तवातील नात्यांबद्दल असमाधान निर्माण होण्याची शक्यता वाढते.

विवाहसंस्थेतील बदल

विवाहापूर्वी दीर्घ ओळख, स्वतः जोडीदार निवडण्याची प्रवृत्ती, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांची वाढ, विवाहानंतर स्वतंत्र राहण्याची इच्छा, समान जबाबदाऱ्या आणि समान निर्णयाधिकार या गोष्टी आता अधिक सामान्य होत आहेत. विवाह टिकवण्यापेक्षा समाधानकारक नाते टिकवण्याला अधिक महत्त्व दिले जात आहे.

विवाहाचे वय वाढल्याने योग्य जोडीदार शोधणे अधिक कठीण होते.

अपेक्षांच्या ओझ्यामुळे अनेक विवाह तुटण्याची शक्यता वाढते. एकल कुटुंबांची संख्या वाढून वृद्ध पालकांचे प्रश्न गंभीर होतात.


✍
सौ. वनिता राजेश अग्रवाल
9404132389


घटस्फोट, एकाकीपणा आणि मानसिक ताण यांसारख्या समस्यांमध्ये वाढ दिसून येते.


जन्मदर घटल्याने भविष्यात लोकसंख्येच्या वयोमान संतुलनावर परिणाम होऊ शकतो.

बदल ही काळाची गरज आहे. परंतु स्वातंत्र्य आणि जबाबदारी, अपेक्षा आणि स्वीकार, व्यक्तिमत्त्व आणि कुटुंब यांचा समतोल राखणे तितकेच आवश्यक आहे. विवाह हा परिपूर्ण व्यक्ती शोधण्याचा प्रवास नसून, दोन अपूर्ण व्यक्तींनी परस्पर समजूतदारपणे एक सुंदर आयुष्य घडवण्याचा प्रयत्न आहे.

वाढते वय आणि वाढलेल्या अपेक्षांनी विवाहसंस्थेचे स्वरूप निश्चितच बदलले आहे. या बदलांकडे केवळ समस्या म्हणून पाहण्याऐवजी सामाजिक परिवर्तन म्हणून पाहण्याची गरज आहे. संवाद, विश्वास, सहकार्य आणि परस्पर आदर या मूल्यांवर आधारलेली विवाहसंस्था भविष्यातही समाजाचा मजबूत पाया राहू शकते. आधुनिकतेचा स्वीकार करताना मानवी नात्यांतील संवेदनशीलता आणि बांधिलकी जपली, तर विवाहसंस्था अधिक सक्षम, समृद्ध आणि अर्थपूर्ण बनेल.

## चिन्हांच्या गर्दीत हरवणारे शब्द


मुकुंद भालेराव, छत्रपती संभाजी नगर
विद्युतसंदेशसंकेतसूत्र –
bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाष्यक्रमांक – ८३० ८८ ३५३ १३

# संवादाला शब्दांची साथ का आवश्यक? (भाग २)

ज्योतिर्मय साहित्य

पहिल्या भागात आपण पाहिले की, डिजिटल माध्यमांमध्ये इमोजी, चिन्हे आणि आयकॉन्स यांच्या वाढत्या वापरामुळे शब्दांचा वापर कमी होत चालला आहे. हा बदल वरवर पाहता सोयीचा वाटतो; पण संवाद, भाषा आणि स्मरणशक्ती यावर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. आता या प्रश्नाकडे संवादशास्त्राच्या दृष्टीने पाहू.

संवादशास्त्रानुसार व्यक्तीचा संवाद केवळ शब्दांद्वारे होत नाही. शब्दांबरोबरच शरीराची भाषा, चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांची हालचाल, हातवारे, मान, खांदे, आवाजातील चढ-उतार अशा अनेक माध्यमांतूनही संवाद घडत असतो. यालाच (नॉनव्हर्बल कम्युनिकेशन) असे म्हणतात.

याचा अर्थ असा नाही की, शब्दांचे महत्त्व कमी आहे. उलट, शब्द आणि शरीरभाषा यांची सांगड घातली गेली तरच संवाद अधिक प्रभावी, अर्थवाही आणि परिणामकारक बनतो. केवळ हावभाव पुरेसे नसतात आणि केवळ शब्दही पुरेशे नसतात तर. दोघांची सांगड म्हणजेच पूर्ण संवाद.

वास्तविक पाहता, भाषा आणि शब्दांची निर्मितीही माणसाच्या संवादाच्या गरजेतूनच झाली असावी. आदिमानव सुरुवातीला कदाचित केवळ हावभाव, चेहऱ्यावरील भाव किंवा विशिष्ट प्रकारचे आवाज यांच्याद्वारे संवाद साधत असेल, परंतु समाजव्यवस्था विकसित होत गेली, विचार अधिक गुंतागुंतीचे होत गेले आणि ज्ञानाचा साठा वाढत गेला, तसतशी शब्दांची आणि भाषेची निर्मिती झाली. त्यामुळे भाषा ही मानवी संस्कृतीची सर्वात मोठी उपलब्धी मानली जाते.

प्रत्येक भाषेत व्याकरणाने मान्य केलेले शब्द असतातच; पण त्याचबरोबर बोलभाषेतून असंख्य नवीन शब्द जन्माला येत असतात. समाज बदलतो, तशी भाषा बदलते. नवीन अनुभवांना नवीन शब्द मिळतात, तर काही जुने शब्द हळूहळू वापरातून जातात. हा बदल स्वाभाविक आहे.

जर आपण जाणूनबुजूनच शब्दांचा वापर कमी करू लागलो, तर परिस्थिती वेगळी होईल. अशा वेळी भाषेचा नैसर्गिक विकास न होता तिचे संकुचन सुरू होईल. शब्दसंग्रह कमी होत जाईल आणि त्याचा परिणाम आपल्या विचारशक्तीवरही होईल, कारण विचार करण्यासाठीही शब्दांची गरज असते.

आज अशी अनेक उदाहरणे दिसतात. ज्या वस्तू आपल्या जीवनातून नाहीशा झाल्या, त्यांच्याशी संबंधित शब्ददेखील हळूहळू विस्मरणात जात आहेत. बळद, कोनाडा, कवडसा, माजघर, आजघर, पडवी, गवाक्ष, कणगी, आवतन, करवली असे कितीतरी शब्द नव्या पिढीला परिचितही नसतील. वस्तू गेल्या, तशी त्यांची नावेही गेली.

आपण सहजपणे ''स्टार्ट टू फिनिश'' म्हणतो; पण ''अथपासून इतिपर्यंत'' हा सुंदर संस्कृत प्रभावित वाक्प्रचार किती जण वापरतात? भाषेतील अशा बदलांकडे आपण फारसे लक्ष देत नाही, पण हीच प्रक्रिया पुढे जाऊन आपल्या दैनंदिन वापरातील शब्दांनाही लागू लागली, तर परिस्थिती चिंताजनक ठरेल.

जर आपण सतत केवळ इमोजी, स्माईली आणि आयकॉन्स यांचाच आधार घेत राहिलो,

तर शब्दांची गरजच उरणार नाही आणि जी गोष्ट वापरली जात नाही, ती हळूहळू स्मरणातून निघून जाते, म्हणूनच शब्दांचा वापर हा केवळ भाषेचा प्रश्न नाही; तो आपल्या विचारक्षमतेचा आणि स्मरणशक्तीचाही प्रश्न आहे.

(क्रमशः)

# प्रवास वर्णन

ज्योतिर्मय साहित्य

जीवनात येणारा प्रत्येक क्षण हा आयुष्याचा प्रवास असतो, पण मला आज काही गंभीर विषयाचे प्रवासवर्णन करावयाचे नाही तर, एक गमतीदार आणि खरोखरचा प्रवास आठवला तो लिहायचा आहे, कारण नेहमीच आयुष्याची गंभीरता नको. साधारण  १९७५, ७६ च्या काळातील प्रसंग असेल. मी आर्ट कॉलेज मध्ये असतांनाची.आर्ट कॉलेजमध्ये आम्हाला कंपल्सरी लॅण्ड स्केल च्या दर महिन्यात ऑन दिस्पॉट लॅण्ड स्केपिंग टूर असायच्या, कंपलसरी तेथे हजर रहावेच लागायचे.

कॉलेजमध्ये  वर्गात मी सी.आर. म्हणून निवडून आले होते, तो पण एक छान हिस्सा होता. नेहमी दैनंदिनी लिहायची लहानपणापासून ची सवय. वकृत्व स्पर्धेत, वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घ्यायची सवय. एके दिवशी सरांनी अचानक सांगितले. कॉलेज सुरु होऊन एक महिना झाला आहे, सी.आर. मतदान करायचे आहे. अकरा विद्यार्थ्यांची नावे आली, सरांनी प्रश्नमंजुषा तयार केली, प्रत्येकाला पहिल्या दिवसापासून अनुभव विचारले, माझ्या दैनंदिनीत रोजचा अभ्यास आणि महत्वाचे मुद्दे असायचे. प्रत्येकाला भाषण करायला सांगितले.  चार शिक्षकांनी निकाल तयार केला, मुलांचे मतदान घेतले, मी निवडून आले, आणि मग....

पुढचा प्रवास जास्तच खडतर होता, आम्हाला सांगितले पावसाळी लॅण्डस्केप ट्रीप काढायची आहे, सर्वांनी ठिकाणे ठरवा, मी लोणावळा, एकवीरा देवीच्या दर्शनाला जाऊ, तेथे निसर्ग चित्र काढून सुचविले. हो नाही करत एकदाचा निर्णय झाला, सरांनी आणि आम्ही सर्व तयारी, टाईम टेबल तयार केले. सर्व तयारीनिशी जाण्याचा दिवस ठरला.

पावसाळ्याचे दिवस होते, आमच्या आर्टच्या लवाजाम्या बरोबरच छत्री, रेनकोट आणि नेहमीचे प्रवासी साहित्य, डबे, सर्दी, ताप गोळ्या वगैरे थोडी तयारी केली. पहाटे पाच लाख पोहोचायचे होते स्थानकावर, माझी, मैत्रिण, भाऊ बरोबर होते. दादर की व्हीटी आता आठवत नाही, पण आम्ही व्यवस्थित पोहोचलो. सर्व विद्यार्थी, शिक्षक सर्व च सुखरूप पोहोचलो, आणि अनाऊन्समेंट झाली, गाडी थोडी लेट येणार, आम्ही नर्व्हस झालो, पण सर आणि मॅडमनी आम्हाला धीर दिला, थोड्या वेळाने कळले गाडी दोन तास लेट आहे, आमचा उत्साह पार मावळून गेला, तरीपण एक अनुभव म्हणून आम्ही एकमेकांना धीर देत थोडा नाश्तापणी केले. व तिथेच थोडे पेन्सिल लॅण्ड स्केप करायला सुरवात केली, वेळ कसा गेला कळलेच नाही, रमतगमत एकदाची गाडी आली, कोणाचे


नातेवाईक आले होते त्यांना निरोप देत आमच्या रिझर्व्हेन सीटवर जाऊन बसलो.गाडी सुरु झाली, कंटाळलेल्या आम्ही मग गाडी तच आपले बैठे खेळ गमती जमती, गाण्याच्या भेंड्या सर्वांचा आवडता विषय, विनोदी किस्से सांगत एकदाचे लोणावळा गाठले, मुसळधार पाऊस सुरू झाला होता, धुक्यात वाट हरवली होती, काही नीट दिसत नव्हते.  जास्त वर्णन करत नाही, वर्णन खूप मोठे होईल. कसेबसे आम्ही भिजतच डोंगर वाट, निसरड्या पायर्या चढत होतो.  धडपडत होतो, एकमेकांना आधार देत होतो, मला एकसारखे वाईट वाटत होते, मीच हे ठिकाण सुचवले होते, जास्त मते या ठिकाणाला पडली, सर्वांना वाटले खूप मजा येईल, पण सगळेच उलटे घडत होते. पाऊस थांबायचे नाव घेत नव्हता, आम्ही पार गाठले होतो. काहींच्या छत्र्या उडाल्या होत्या,




आमच्या छत्र्यांचे कावळे झाले होते, आणि आमची तोंडे चिमणीसारखी झाली होती. रेनकोटवालेही भिजत होते, नीट चालता येत नसल्याने आम्ही एकमेकांना धरुन धडपडत होतो. वरती चढे पर्यंत खूप वेळ झाला होता.  भूक तर लागलीच होती, दही लागला होता, थंडीत वाजत होती, सर्व गारेगार झाले होते, अति उत्साही मुलेही पार रडवेली झाली होती.

कसेबसे आईच्या देवळात पोहोचलो, देवीसाठी खण,नारळ, फुले ओटी कशीबशी घेतली तिथल्या दुकानातून. एकवीरा आईची पूजा करुन दर्शन घेतले, तिमनोभावे तिला सांगितले, आम्हाला दर्शन दिलेस, आता सर्वांना सुखरूप घरी पोहोचव. देवीला साकडे घालून, दर्शन घेऊन, नतमस्तक होऊन प्रसाद घेऊनआम्ही बाहेर पडलो.  आता आम्हाला आमचे मुख्य काम म्हणजे, निसर्ग दृश्ये ऑन दि स्पॉट पेंटिंग करणे, पण भुकेची ही वेळ होऊन गेली होती.

सरांनी सांगितले आधी डबे खाऊन घ्या, मग पेंटिंग करा. सर्वांनी छान खाऊ आणला होता, मी पण दोन तीन वेगळे प्रकार करुन नेले


स्वप्नगन्धा सतीश आम्बेतकर
कलाशिक्षिका. विरार
मो. 97301 74088



होते, आदल्या रात्रीचे जागरण, आणि असा ओला प्रवास, आमचा आनंद, उत्साह आवडत्या पावसाने त्यावर विरजण पाडले होते, पाऊस अगदी खास आमची फजिती पहाण्यास उत्सुक होता. डबे खाण्यासाठी कुठे निवांत जागा नव्हती, भूकेचा डोंब, आणि हाता तोंडाची गाठभेट होत नव्हती. जवळच बौद्ध स्तूपाची लेणी होती ती पाहिली, अभ्यासक्रमाचाच तो एक भाग होता. कुठेतरी कधीतरी जागा मिळवून भिजत भिजत आम्ही डब्यात ला खाऊ खाल्ला. किंचित पाऊस थांबल्यासारखा वाटला, पेंटिंग करावेसे वाटत होते, आल्यासारखे एखादे तरी पेंटिंग करु, जागा शोधणे, एखादा व्हयू शोधणे, सामानाची मांडामांड  करेपर्यंत थोडा वेळ गेला, आणि अचानक खोकल्याची उबळ यावी तसा पाऊस जोरात कोसळू लागला, सामान आवरतांना आमची पार भंबेरी उडाली. आम्ही एकमेकांच्या मदतीने कसेबसे आवरते घेतले. ओले सुके सामान कसेबसे बॅगेत कोंबले.

सर, मॅडमनी सांगितले चला आता आवरा, आपण परत जायला निघतोय. पावसाचा जोर वाढतच होता, तो अत्यानंदाने बरसतच होता. त्याच्या जोडीला सौदामिनी चमकत होती, आम्ही सारेच भयभीत झालो होतो, अंधारही वाटायचा, मध्येच वीजेचा कडकडाट, आता मात्र आमची भितीने गाळण उडाली होती, परिस्थिती आणीबाणी ची होती.

एकवीरा आईचे नाव घेत आम्ही आमचा नमस्कार करुन सारा गाजावाजा आटपला आणि उतरती कडे निघालो. पावसाचा मारा, वीजेचा अचानक लोळ आम्ही भयभीत अवस्थेत धडपडत उतरत होतो.  असे वाटत होते, पाऊस थांबावा, कुठेतरी आडोसा मिळावा, कपभर गरम चहा, आणि झणझणीत कांदा भजी मिळावी, म्हणजे या सहलीचा हा वेगळाच शहारणारा अनुभव आपल्या शैक्षणिक सहलीत नमूद करता आला असता. पण कसले काय नि कसले काय?  खूप खाली एक झोपडी वजा चहाची टपरी दिसली, आम्ही खूप आशेने तिथे मजल दरमजल कूच करीत निघालो संध्याकाळ होतच आली होती, अंगातील त्राण गेल्यासारखे उगाचच वाटत होते.

कसेबसे आम्ही खाली पोहोचलो. करंदीकर सर, बापट सर पुढे गेले, त्यांनी चहावाल्याला चहाबद्दल सांगितले, भजीबद्दलली ऑर्डर दिली, पण त्याने सांगितले भजी करायला जमायचा न्हाय, चार मिळेल आम्ही फर्मास चहा, आणि झक्कास भजी ची फर्माईश मनामनात घोळवून अर्धातास वाट बघत राहिलो, थोड्या वेळाने दोन  मुले त्यांच्याइतकाच उदास, पण गरम चहा सर्वांना देत होती, त्याचा रंग आणि चव सांगण्यासारखे नसली तरी ते गोडसर गरम पाणी पिऊन आम्ही स्वतः मध्ये थोडे उत्साहाचे अवसान भरले. पैसे देऊन झाल्यावर आम्ही रणरागिणी च्या कोर्टात खाली उतरायला सुरुवात केली, पाऊस किंचित विश्रांती साठी थांबला की चहा प्यायला गेला माहित नाही आम्ही उरलेला रस्ता खाली जायला सुरुवात केली केली तोच त्या पावसाला आमची आठवण आली. घाईगडबडीत त्यानेही पुन्हा कोसळायला सुरुवात केली. आता आमच्यापुढे कोणताच पर्याय नव्हता. शेवटी आहे त्या स्थितीत आणि परिस्थितीत मार्ग आक्रमायला सुरुवात केली.   नंतर खूप वेळाने थांब्यावर बस आली, नशीब आम्ही सर्व जण कसेबसे आत शिरलो, आमच्या केविलवाण्या सामानासहित. योग्य ठिकाणी उतरलो, आपल्या प्रिय मैत्रिण ट्रेनची आतुरतेने वाट पहात होतो. लाऊडस्पीकर नवीन उत्साहाने ट्रेनच्या आगमनाची वेळ सांगत होता, आम्ही सशासारखे कान उभारुन ऐकत होतो, सर्वांना आता घरी जायची घाई झाली होती, पुन्हा आवाज आला ट्रेन लेट आहे.

आमच अवसान गळाले, आम्ही स्टेशनवर च्या वेटिंग रुम मध्ये बसलो, फ्रेश झालो पुन्हा नव्याने स्वतः ला तयार केले, थोड्या वेळाने कळले ट्रेन चार तास लेट आहे.

आता अगदी शेवटचा श्वास संपल्यासारखे वाटले, आपण घरी पोहोचणार की नाही तेच कळेनासे झाले. रात्र बरीच व्हायला आली होती. यथावकाश ट्रेन आपल्या स्वत : च्या टाईमटेबलनुसार वेळेवरच आली म्हणायची.  शिक्षकांचा जीव आम्हाला घेऊन ट्रेन मध्ये चढताना खात्री करुन घेत होता, आपण आणलेले सर्व नग चढले की नाही गाडीत. आम्ही सर्वांनी हाजिर है सांगताच त्यांचा देह गाडीत चढला. जीव भांड्यात पडला, श्वास ठिकाणावर आला.

मजल दर मजल करीत आम्ही गाडीत पुन्हा गप्पागोष्टी, गाण्यात रममाण झालो, कारण शिक्षकांनी सांगितले कसेही कां होईना आपल्याला उशीर जरी झाला तरी आपण देवीच्या कृपेने सुखरूप आहोत, आपल्याला जरी त्रास झाला तरी जीवनात एक अनुभव मिळाला, आपण सर्व  एकत्र होतो म्हणून कोणतीही इजा न होता आपण सुखरूप पोहोचलो, देवीचे दर्शन तर शांतपणे घ्यायला मिळाले, जरी अभ्यासाची एक संधी हुकली तरी संकटावर मात करुन वेळेवर तेथून निघण्याची बुद्धी देवीनेच आपल्याला दिली.

तिने निवांतपणे, शांतपणे आपल्याला दर्शन तर दिलेच.  पण एक संदेश ही दिला आहे की, जीवनात येणार्या कोणत्याही परिस्थितीत खचून नाही जाता, एकमेकांना साथ दिली तर आत्मिक बळ वाढते.  जर आपल्यापैकी, कोणी पडले असते, हरवले असते, कोणी आजारी पडले असते तर? सरांच्या या उपदेशाने आम्ही भानावर आलो,  प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात प्रवासादरम्यान असे प्रसंग येतात, पण समयसूचकतेने, देवावरच्या श्रद्धेने आपण त्यातून निभावून जाऊ शकतो

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559